


सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक १५ • सोमवार दि.५ ऑक्टोंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

## निवडणूक आयोगाने आठवडाभरात उत्तर द्यावे-सुप्रिम कोर्ट

### ज्ञानेश कुमारांचे निलंबन व निर्णयांना स्थगिती देण्यास नकार



नवी दिल्ली:मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कारभाराविरोधात निलंबन अथवा त्यांनी घेतलेल्या निर्णयाला स्थगितीच्या मागणीसाठी दाखल करण्यात आलेल्या याचिका सर्वोच्च न्यायालयातील सरन्यायाधीश सूर्यकांत, न्या. जॉयमाल्या बागची आणि न्या.व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने नकार दिला आहे. या संदर्भात पुढील तारखेपर्यंत निवडणूक आयोगातील तीनही आयुक्तांनी उत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत.

केंद्रीय निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात दाखल झालेल्या याचिकांवर सोमवारी सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने निवडणूक आयोगाला नोटीस बजावत तीनही निवडणूक आयुक्तांकडून आरोपांबाबत उत्तर मागविले. मात्र, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना त्यांच्या पदावरून निलंबित करण्याचा किंवा त्यांच्या अधिकृत कर्तव्यांवर अंतरिम स्थगिती देण्याचा आदेश देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. या प्रकरणाची पुढील सुनावणी पुढील आठवड्यात होणार आहे. पटना येथील रहिवासी राकेश कुमार सिंह आणि दिल्लीतील वकील शैलेंद्र मणी त्रिपाठी यांनी ज्ञानेश कुमार यांच्या कारभाराविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. या याचिकांवर सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ विकास सिंह यांनी जोरदार युक्तिवाद केला. मुख्य निवडणूक आयुक्तांच्या कारभारामुळे निवडणूक आयोगावरील विश्वासार्हता कमी झाल्याचा दावा त्यांनी केला. ज्ञानेश कुमार यांना तातडीने निलंबित करावे, तसेच प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत त्यांना अधिकृत कर्तव्य बजावण्यापासून रोखावे, अशी मागणी त्यांनी न्यायालयाकडे केली. यावेळी त्यांनी कठोर शब्दांत भूमिका मांडत, अंतरिम आदेश न दिल्यास देशात गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते, असा युक्तिवाद केला. यावर सरन्यायाधीशांनी पान ४ वर

## एमपीएससी अध्यक्ष-सदस्यांच्या चौकशीसाठी समिती

### फडणवीसांची राज्यपालांकडे शिफारस

मुंबई/प्रतिनिधी-महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) कारभारा -विरोधात पुण्यात सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दखल घेतली असून, आयोगाचे माजी व विद्यमान अध्यक्ष तसेच सदस्यांविरोधात भारतीय संविधानाच्या कलम ३१७ अन्वये चौकशी करण्यासाठी समिती गठीत करावी, अशी शिफारस राज्यपाल जिष्णुदेव वर्मा



यांच्याकडे केली आहे. उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली ही समिती गठीत करून तीन महिन्यांत अहवाल मागवावा आणि अहवालातील निष्कर्षांच्या आधारे पुढील कार्यवाही करावी, अशी विनंती मुख्यमंत्र्यांनी केली आहे.

एमपीएससीकडून घेण्यात आलेल्या अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याचे प्रकरण समोर आल्यानंतर स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी आक्रमक झाले आहेत. प्रश्नपत्रिका फुटीचा लाभ तीन विद्यार्थ्यांना झाल्याचे तपासात समोर आले असून, या प्रकरणात पान ४ वर

## ९९ टक्के हिस्सेदारी,तरी खा.पार्थ पवार आरोपी नाही!

### डीजीपींकडून सखोल चौकशीचे उच्च न्यायालयाचे आदेश

मुंबई/प्रतिनिधी-पुण्यातील सुमारे १ हजार ८०० कोटी रुपयांच्या महार वतन जमीन व्यवहारप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने उपस्थित केलेल्या गंभीर प्रश्नांच्या पार्श्वभूमीवर पोलीस तपासाला आता वेग आला आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांची संबंधित कँपनीत ९९ टक्के हिस्सेदारी असतानाही त्यांना आरोपी का करण्यात आले नाही, असा सवाल न्यायालयाने उपस्थित केला होता. त्यानंतर पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी या प्रकरणाचा अधिक व्यावसायिक, सखोल आणि सर्वसमावेशक तपास करण्याचे आदेश दिले आहेत.

या प्रकरणातील तपास अधिकारी दत्तात्रय वाघमारे यांनी न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात पार्थ पवार यांचा व्यवहारातील थेट आर्थिक सहभाग, स्वाक्षरी, दूरध्वनीवरील संभाषण अथवा संबंधित बैठकांमध्ये सहभाग असल्याचा कोणताही पुरावा तपासात आढळला नसल्याचे नमूद केले आहे. तसेच मर्यादित दायित्व भागीदारी (एलएलपी) कायद्यानुसार केवळ कँपनीतील हिस्सेदारीच्या आधारे एखाद्या व्यक्तीला अप्रत्यक्षपणे आरोपी करता येत नसल्याची भूमिका पोलिसांनी मांडली आहे.मात्र, या भूमिकेवर न्यायालयाने प्रश्न उपस्थित केला. ९९ टक्के हिस्सेदारी असलेली व्यक्ती जबाबदार नाही आणि १ टक्का हिस्सेदारी असलेली व्यक्ती आरोपी आहे, हे कसे? असा सवाल न्यायमूर्ती माधव जामदार यांनी सरकारला केला होता. त्यामुळे तपासाच्या पद्धतीबाबत न्यायालयाने उपस्थित केलेल्या मुद्द्यांना आता पोलिसांकडून गांभीर्याने घेतले जात आहे.या पार्श्वभूमीवर डीजीपी सदानंद दाते यांनी पुणे पोलीस आयुक्तांना तपासाचा नियमित साप्ताहिक आढावा घेण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच पुढील सहा आठवड्यांत तपासाचा पान ४ वर

## आदिवासी विद्यार्थ्यांची पोलिसांशी धक्काबुक्की

### आठव्या दिवशी उलगुलान मोर्चाला ठाण्यात अडविले

ठाणे:आदिवासी आश्रमशाळांमधील ढासळलेली शिक्षण व्यवस्था, निकृष्ट भोजन आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मुंबईच्या दिशेने निघालेल्या विद्यार्थ्यांच्या उलगुलान मोर्चाला आठव्या दिवशी ठाणे हद्दीत पोलिसांनी अडविले. यावेळी पोलिस आणि विद्यार्थ्यांमध्ये धक्काबुक्की झाल्याचा आरोप आंदोलकांनी केला असून, काही विद्यार्थ्यांना ताब्यात घेण्यात आल्याचे सांगण्यात आले. कारवाई दरम्यान काही विद्यार्थ्यांची प्रकृती खालावल्याने त्यांना भिवंडीतील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

आंदोलकांच्या माहितीनुसार, रात्री सुमारे एक वाजता पोलिसांनी विद्यार्थ्यांना मुंबईच्या दिशेने पुढे जाण्यास सांगितले. विद्यार्थी पुढे निघाल्यानंतर ठाणे हद्दीत अचानक त्यांना अडविण्यात आले. यावेळी झालेल्या धावपळीत काही विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडली. त्यांना भिवंडी बायपास परिसरात सोडण्यात आल्यानंतर स्थानिक खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. जबाब नोंदवल्यानंतर विद्यार्थ्यांना सोडण्यात येणार असल्याची माहिती आहे. आश्रमशाळांमधील शिक्षण व्यवस्था तातडीने सुधारावी, सेंट्रल किचनची व्यवस्था बंद करून शाळांच्या आवारातच ताजे व पौष्टिक भोजन द्यावे, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध कराव्यात, अशी आंदोलकांची मागणी आहे. सर्पदंशामुळे मृत्युमुखी पडलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना एक कोटी रुपयांची नुकसानभरपाई द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. आश्रमशाळांच्या दुरवस्थेला जबाबदार असलेल्या आदिवासी विकास विभागाचे मंत्री, आयुक्त आणि सचिवांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणीही विद्यार्थ्यांनी केली आहे.

## अचूक मतदार यादीसाठी एसआयआर महत्त्वाचे:फडणवीस

मुंबई/प्रतिनिधी-एसआयआर अर्थात विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेवरून विरोधकांकडून सरकार आणि निवडणूक आयोगावर टीका होत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एसआयआरचे समर्थन केले. एक नागरिक, एक मत या तत्त्वाला बळ देण्यासाठी अचूक आणि अद्ययावत मतदार यादी आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले.

एसआयआरच्या माध्यमातून मतदार यादीतील मृत व्यक्तींची नावे, दुबार नोंदी तसेच स्थलांतरामुळे झालेल्या बदलांची पडताळणी केली जाते. त्याचबरोबर नव्या पात्र मतदारांचा यादीत समावेश करण्याची प्रक्रियाही केली जाते. भारतात मतदार याद्यांचे सखोल पुनरीक्षण गेल्या अनेक दशकांपासून होत असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.शहरीकरण, स्थलांतर आणि लोकसंख्येतील बदलांमुळे मतदार याद्यांमध्ये सातत्याने बदल होत असतात. त्यामुळे वेळोवेळी सखोल पडताळणी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत राहावे आणि कोणताही पात्र मतदार वगळला जाऊ नये, हे महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी नमूद केले. नागरिकांनी एसआयआर प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेऊन लोकशाही अधिक सक्षम करावी, असे आवाहन फडणवीस यांनी केले.

## ८९४ प्रकरणांच्या चौकशीसाठी सीटूचा कामगार कार्यालयावर मोर्चा

नांदेड/प्रतिनिधी-घरेलू कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सीटू संलग्न घर कामगार संघटनेच्या वतीने सोमवारी (दि.५ ऑक्टोबर) महात्मा फुले पुतळा, आयटीआय कॉर्नर येथून सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

जुन्या-नवीन कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमल-बजावणी, पात्र कामगारांना लाभ, नोंदणी व नूतनीकरण सुलभ करणे आणि ८९४ प्रकरणांतील कथित अनियमिततेची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. कामगार उपआयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग यांच्या पत्रात नमूद ८९४ प्रकरणांतील अनियमिततेची स्वतंत्र चौकशी करावी. तसेच मंजूर ५८९ अर्जांत वितरित झालेल्या ७९ लाख ६९ हजार रुपयांची तपासणी करून अपात्र लाभाची रक्कम वसूल करावी, अशी मागणी संघटनेने केली. सन्मानधन, अपघात, मृत्यू, अंत्यविधी, प्रसूती, शिक्षण व कौशल्यविकास योजनांचा लाभ वेळेत मिळावा, तसेच कामगार कार्यालयात स्वतंत्र




हेल्प डेस्क सुरू करावा, अशीही मागणी करण्यात आली. मोर्चाचे नेतृत्व घर कामगार संघटनेचे अध्यक्ष कॉ. गंगाधर गायकवाड, कार्याध्यक्ष कॉ. उज्ज्वला पडलवार, सरचिटणीस कॉ. करवंदा गायकवाड, जमसं जिल्हाध्यक्ष कॉ. लता गायकवाड यांनी केले. यावेळी सुभाषचंद्र गजभारे, मंगेश वट्टेवाड, राहुल नरवाडे, अरुणा जोगदंड, मंदा नेहारे, सुरेखा कांबळे आदी सहभागी झाले. सहाय्यक कामगार आयुक्तांना निवेदन सादर करण्यात आले.

## दिल्ली दंगल,हिंसाचार प्रकरणी चौकशीच्या याचिका उच्च न्यायालयाने फेटाळल्या

नवी दिल्ली:ईशान्य दिल्लीतील २०२० च्या दंगली आणि २०१९ च्या जामिया मिलिया इस्लामिया हिंसाचाराची स्वतंत्र किंवा विशेष तपास पथकामार्फत (एसआयटी) चौकशी करावी, तसेच कथित भडकाऊ भाषणे करणाऱ्या राजकीय नेत्यांविरोधात एफआयआर दाखल करावा आणि कर्तव्यात निष्काळजीपणा करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी करणाऱ्या विविध याचिका दिल्ली उच्च न्यायालयाने सोमवारी फेटाळून लावल्या.

फेब्रुवारी २०२० मध्ये नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए) आणि राष्ट्रीय नागरिक नोंदणी (एनआरसी) विरोधातील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ईशान्य दिल्लीत मोठा हिंसाचार झाला होता. जाफराबाद, मौजपूरसह अनेक भागांत दगडफेक, जाळपोळ आणि तोडफोडीच्या घटना घडल्या. या हिंसाचारात आयबी कर्मचारी अंकित शर्मा यांच्यासह किमान ५३ जणांचा मृत्यू झाला, तर सुमारे ७०० जण जखमी झाले. मोठ्या प्रमाणावर घरे, दुकाने, वाहने आणि अन्य मालमत्तेचे नुकसान झाले. याप्रकरणी दाखल झालेल्या याचिकांमध्ये दिल्ली पोलिसांच्या तपासावर प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. पोलिस, रॅपिड अॅक्शन फोर्स आणि अन्य सरकारी अधिकाऱ्यांच्या कथित गैरवर्तनाची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली होती. मात्र, न्या.विवेक चौधरी आणि न्या.मनोज जैन यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. काही याचिकांमध्ये भाजप नेते कपिल मिश्रा, अनुराग ठाकूर, प्रवेश साहिब सिंह वर्मा आणि अभय वर्मा यांच्यासह अन्य राजकीय नेत्यांविरोधात कथित भडकाऊ भाषणांप्रकरणी गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली होती. काही याचिकांमध्ये अन्य पक्षांच्या नेत्यांविरोधातही कारवाईची मागणी करण्यात आली होती. मात्र, उच्च न्यायालयाने संबंधित मागण्याही फेटाळल्या. सीपीआय(एम) नेत्या वृंदा करात यांच्या याचिकेत दंगलीदरम्यान पोलिस आणि अन्य सरकारी यंत्रणांकडून कथित निष्काळजीपणा झाल्याचा आरोप करत स्वतंत्र चौकशीची मागणी करण्यात आली होती. एका अन्य याचिकेत सीएए-विरोधी आंदोलनांना कथित निधीपुरवठा आणि समर्थनाची राष्ट्रीय तपास संस्था (एनआयए) मार्फत चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती. १५ डिसेंबर २०१९ रोजी सीएए-विरोधी आंदोलनादरम्यान जामिया परिसरात हिंसाचार झाला होता. दगडफेक आणि वाहनांच्या जाळपोळीनंतर पोलिसांनी लाठीचार्ज आणि अश्रुधुराचा वापर केला. त्यानंतर पोलिस विद्यापीठ परिसरात दाखल झाल्याने विद्यार्थ्यांवरील कारवाईवरून वाद निर्माण झाला होता. या घटनेचीही स्वतंत्र एसआयटीमार्फत चौकशी करण्याची मागणी करण्यात आली होती. दोन्ही प्रकरणांवरील सुनावणी पूर्ण झाल्यानंतर दिल्ली उच्च न्यायालयाने २४ जुलै २०२६ रोजी निर्णय राखून ठेवला होता. अखेर ५ ऑक्टोबर रोजी न्यायालयाने सर्व संबंधित याचिका फेटाळल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे ईशान्य दिल्ली दंगल आणि जामिया हिंसाचाराच्या स्वतंत्र एसआयटी चौकशीची मागणी न्यायालयीन पातळीवर मान्य झालेली नाही. सविस्तर लिखित निकालातील कारणे समोर आल्यानंतर न्यायालयाच्या निर्णयाची कायदेशीर भूमिका अधिक स्पष्ट होणार आहे.

## तीन सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

### खंदारे वन विभागात,यादव पर्यटन विभागात

मुंबई/प्रतिनिधी-राज्य सरकारने सोमवारी, दि. ५ ऑक्टोबर रोजी प्रशासकीय पातळीवर महत्त्वाचा फेरबदल करत तीन सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले. यामध्ये संजय खंदारे, संजय यादव आणि वैष्णवी बी. या भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

सन १९९६ च्या तुकडीतील सनदी अधिकारी संजय खंदारे यांची पर्यटन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदावरून वन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदी बदली करण्यात आली आहे. त्यामुळे वन विभागाच्या प्रशासकीय कामकाजाची जबाबदारी आता खंदारे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.सन २००९ च्या तुकडीतील संजय यादव हे समग्र शिक्षा अभियानाचे राज्य प्रकल्प संचालक म्हणून कार्यरत होते. त्यांची आता पर्यटन विभागाच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पर्यटन विभागाच्या कामकाजाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.दरम्यान, सन २०१९ च्या तुकडीतील वैष्णवी बी. यांची नागपूर विभागाच्या अतिरिक्त विभागीय आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

# गेंड्याच्या कातडीची सत्ता!

पुण्यात एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचे आंदोलन गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. एस.एम. जोशी मार्गावर सुरू असलेल्या आंदोलनाची सुरुवात १ ऑक्टोबरच्या सायंकाळी झाली. एमपीएससीचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी या आंदोलनाच्या केंद्रस्थानी आहे. कथित पेपरफुटी, परीक्षा प्रक्रियेतील गोंधळ आणि व्यवस्थेवरील ढासळता विश्वास यामुळे विद्यार्थ्यांचा संताप उफाळून आला आहे.या आंदोलनाकडे पारंपरिक इलेक्ट्रॉनिक आणि प्रिंट माध्यमांचे अपेक्षित लक्ष गेले नसले, तरी विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून आपला आवाज महाराष्ट्रभर पोहोचवला आहे. फेसबुक लाईव्ह, व्हॉट्सप आणि यूट्यूबसारख्या माध्यमांवर आंदोलनाचे थेट प्रक्षेपण सातत्याने होत आहे. हजारो विद्यार्थी या आंदोलनात सहभागी असल्याचे चित्र या माध्यमांतून दिसत आहे. त्यामुळे माध्यमांमध्ये बातमीला किती जागा मिळाली, यापेक्षा प्रश्न किती गंभीर आहे, हे सरकारने पाहण्याची गरज आहे.या आंदोलनाला राजकीय पाठिंबाही मिळत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे आ.रोहित पवार आंदोलनस्थळी सहभागी झाले असून विद्यार्थ्यांसोबत मुक्कामही केला आहे. विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनीही आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. मात्र या पाठिंब्यामुळे आंदोलनाचे मूळ स्वरूप बदलत नाही. हा प्रश्न विद्यार्थ्यांच्या भविष्याचा आणि परीक्षा व्यवस्थेवरील विश्वासाचा आहे. पुण्यात तीन वेगवेगळ्या ठिकाणी आंदोलने सुरू असल्यामुळे आंदोलनात फूट पडल्याची चर्चा आहे. मागण्यांमध्ये काही फरकही आहेत. कुणाचा भर ऑब्जेक्टिव्ह परीक्षेवर आहे, कुणी डिस्क्रिप्टिव्ह पद्धतीचा मुद्दा मांडत आहे, तर एस. एम. जोशी मार्गावरील आंदोलनात आयोगाच्या अध्यक्षांच्या राजीनाम्याची मागणी प्रमुख आहे. मात्र या वेगवेगळ्या मागण्यांच्या मुळाशी एकच अस्वस्थता आहे, एमपीएससीच्या परीक्षा व्यवस्थेबद्दल निर्माण झालेला अविश्वास.स्पर्धा परीक्षेची तयारी करणारा विद्यार्थी केवळ एका परीक्षेसाठी अभ्यास करत नसतो. तो आपल्या आयुष्यातील अनेक वर्षे, कुटुंबाचा पैसा आणि स्वतःच्या तरुणपणातील अमूल्य वेळ या स्वप्नासाठी खर्च करतो. परीक्षेच्या तारखा, पद्धती, निकाल किंवा प्रक्रियेबाबत वारंवार अनिश्चितता निर्माण झाली तर त्याचा थेट परिणाम विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि आर्थिक स्थितीवर होतो. त्यामुळे त्यांच्या तक्रारींकडे 'आंदोलन' म्हणून नव्हे, तर व्यवस्थेवरील विश्वासाचा इशारा म्हणून पाहिले पाहिजे. सरकारने विद्यार्थ्यांशी चर्चा केली, काही मागण्यांबाबत आश्वासनेही दिली; तरी आंदोलन पूर्णपणे मागे घेतले गेलेले नाही. याचा अर्थ आश्वासनांपेक्षा विद्यार्थ्यांना आता ठोस कृती हवी आहे. आरोप खरे आहेत की नाहीत, याचा निर्णय चौकशीने होईल; परंतु चौकशीची मागणी करावी लागणे आणि तिच्यासाठी विद्यार्थ्यांना रस्त्यावर उतरावे लागणे, हीच प्रशासनासाठी गंभीर बाब आहे. लोकशाहीमध्ये सरकारचे काम केवळ कायदा-सुव्यवस्था राखणे नाही; नागरिकांचा आवाज वेळेत ऐकणे हीदेखील त्याची जबाबदारी आहे. परंतु आज अशी परिस्थिती निर्माण होत आहे की, एखाद्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलन दीर्घकाळ चालवावे लागते, उपोषण करावे लागते किंवा एखाद्या राजकीय नेत्याला त्यात सहभागी व्हावे लागते. ही प्रवृत्ती लोकशाहीसाठी निश्चितच चिंताजनक आहे. पुण्यातील एमपीएससी आंदोलन त्याचेच उदाहरण ठरू नये. विद्यार्थ्यांनी किती दिवस रस्त्यावर बसावे, किती जणांनी आंदोलनात सहभागी व्हावे किंवा त्याला किती प्रसिद्धी मिळावी, यावर प्रश्नाची गंभीरता ठरू नये. दहा विद्यार्थ्यांची तक्रार असो किंवा दहा हजारांची, तक्रारीत तथ्य असेल तर शासनाने तिची दखल घेतलीच पाहिजे.आज सोशल मीडिया हे विद्यार्थ्यांच्या हातातील प्रभावी माध्यम बनले आहे. पारंपरिक माध्यमांनी एखाद्या आंदोलनाकडे दुर्लक्ष केले तरी फेसबुक लाईव्ह किंवा यूट्यूबवरून त्याचा आवाज हजारो लोकांपर्यंत पोहोचू शकतो. त्यामुळे आंदोलन प्रसिद्धीपासून दूर आहे, असा समज करून घेणे सरकारसाठी धोकादायक ठरेल. डिजिटल माध्यमांतील हा आवाज दुर्लक्षित करता येणार नाही.सत्तेला संवेदनशीलता आवश्यक असते. गेंड्याच्या कातडीला संवेदना नसतात, असे आपण म्हणतो. पण सरकारनेही जनतेच्या प्रश्नांकडे तितक्याच निर्विकारपणे पाहायला सुरुवात केली तर लोकांच्या मनात सत्तेबद्दल अशीच भावना निर्माण होणे स्वाभाविक आहे. सत्ता ही जनतेने दिलेली जबाबदारी आहे; जनतेच्या प्रश्नांपासून स्वतःला सुरक्षित ठेवण्यासाठीचे कवच नव्हे.एमपीएससीच्या अध्यक्षांवरील आरोपांची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. दोष आढळल्यास कारवाई झाली पाहिजे आणि आरोप तथ्यहीन असतील तर तेही पारदर्शकपणे स्पष्ट केले पाहिजेत. विद्यार्थ्यांच्या शंकांना केवळ आश्वासनांनी नव्हे, तर तथ्य, चौकशी आणि निर्णयाने उत्तर मिळाले पाहिजे.हा लढा केवळ एका पदावरील व्यक्तीच्या राजीनाम्यापुरता मर्यादित नाही. महाराष्ट्रातील लाखो तरुणांना सरकारी परीक्षा व्यवस्थेवर विश्वास ठेवता येईल का, हा त्यामागचा मूलभूत प्रश्न आहे. त्या विश्वासाला तडा गेला तर त्याची किंमत केवळ विद्यार्थ्यांना नव्हे, तर संपूर्ण प्रशासनाला मोजावी लागेल. विद्यार्थ्यांचा आवाज ऐकण्यासाठी त्यांना रस्त्यावर किती दिवस बसावे लागणार, हा प्रश्न सरकारने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. लोकशाहीत जनतेने सत्तेला जागे करण्यासाठी आंदोलन करावे लागणे, ही लोकशाहीची ताकद नसून सत्तेच्या संवेदनशीलतेवरील गंभीर प्रश्नचिन्ह आहे.

# शिक्षक:समाजाच्या भविष्याचा शिल्पकार



५ ऑक्टोबर हा दिवस जगभरात जागतिक शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. शिक्षणाच्या क्षेत्रात शिक्षकांचे असलेले अनन्यसाधारण योगदान अधोरेखित करण्याबरोबरच शिक्षकांच्या प्रतिष्ठेचा, त्यांच्या कार्यपरिस्थितीचा, शिक्षणाच्या गुणवत्तेचा आणि भावी पिढीच्या जडणघडणीचा गांभीर्याने विचार करण्याचा हा दिवस आहे. शिक्षक म्हणजे केवळ पाठ्यपुस्तकातील धडे शिकविणारी व्यक्ती नव्हे, तर विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारा, त्याच्या विचारांना दिशा देणारा आणि समाजाच्या भविष्यातील नागरिकांची निर्मिती करणारा महत्त्वाचा घटक होय. एका शिक्षकाच्या कार्याचा परिणाम एका वर्गापुरता किंवा एका शैक्षणिक वर्षापुरता मर्यादित राहत नाही. त्याच्या शिकवणीचा प्रभाव विद्यार्थ्याच्या संपूर्ण आयुष्यावर आणि त्यामार्फत कुटुंब, समाज व राष्ट्राच्या विकासावर पडत असतो. म्हणूनच शिक्षकाचा सन्मान हा केवळ एका व्यवसायाचा सन्मान नसून ज्ञान, शिक्षण, संस्कार आणि सामाजिक परिवर्तनाच्या शक्तीचा सन्मान आहे.

जागतिक शिक्षक दिनाच्या निमित्ताने शिक्षकांच्या कार्याचा विचार करताना शिक्षणाचा व्यापक अर्थ समजून घेणे आवश्यक आहे. शिक्षण म्हणजे केवळ वाचन, लेखन, गणित किंवा विविध विषयांचे ज्ञान आत्मसात करणे नव्हे. शिक्षण व्यक्तीला स्वतःचा विचार करण्याची, योग्य-अयोग्य यातील फरक ओळखण्याची, प्रश्न विचारण्याची, निर्णय घेण्याची आणि समाजाप्रती जबाबदारी स्वीकारण्याची क्षमता देते. या प्रक्रियेत शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. विद्यार्थी किती माहिती लक्षात ठेवतो यापेक्षा तो मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग जीवनात कसा करतो, समस्या कशा सोडवतो, इतरांशी कसा वागतो आणि समाजाच्या हितासाठी काय योगदान देतो, याला आज अधिक महत्त्व आहे. त्यामुळे शिक्षक हा ज्ञानाचा केवळ प्रसारक न राहता विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासाचा मार्गदर्शक बनला पाहिजे.भारतीय समाजात शिक्षकाला ऐतिहासिकदृष्ट्या विशेष स्थान प्राप्त झाले आहे. गुरु-शिष्य परंपरेपासून आधुनिक शिक्षणव्यवस्थेपर्यंत शिक्षकाची भूमिका सातत्याने बदलत आली आहे. पूर्वी शिक्षकाकडे ज्ञानाचा प्रमुख स्रोत म्हणून पाहिले जात होते. विद्यार्थी ज्ञान मिळविण्यासाठी शिक्षकाकडे जात असे. आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे ज्ञानाचे अनेक स्रोत विद्यार्थ्याच्या हातात आले आहेत. भ्रमणध्वनी, संगणक, इंटरनेट, डिजिटल ग्रंथालये, ऑनलाइन अभ्यासक्रम आणि विविध शैक्षणिक व्यासपीठांमुळे काही क्षणांत प्रचंड माहिती उपलब्ध होते. अशा परिस्थितीत शिक्षकाची गरज संपली नसून त्याची भूमिका अधिक व्यापक झाली आहे. माहिती आणि ज्ञान यांतील फरक विद्यार्थ्याला समजावून सांगणे, उपलब्ध माहितीची सत्यता तपासण्याची सवय लावणे आणि ज्ञानाचा विवेकपूर्ण उपयोग करण्यास प्रवृत्त करणे हे आजच्या शिक्षकाचे महत्त्वाचे कार्य आहे.

तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकासमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे बदलत्या साधनांशी स्वतःला सतत अद्ययावत ठेवणे. डिजिटल शिक्षणामुळे वर्गखोलीची पारंपरिक सीमा विस्तारली आहे. प्रत्यक्ष वर्गाबरोबर ऑनलाइन अध्यापन, ध्वनिचित्रफिती, आंतरक्रियात्मक सामग्री, आभासी प्रयोगशाळा आणि डिजिटल मूल्यमापनाच्या पद्धती वापरल्या जात आहेत. मात्र तंत्रज्ञानाचा वापर हा शिक्षणाचा उद्देश नसून शिक्षण अधिक परिणामकारक करण्याचे साधन आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान विद्यार्थ्याला माहिती देऊ शकते; परंतु त्याला संवेदनशील, जबाबदार आणि विवेकी नागरिक बनविण्याचे कार्य मानवी शिक्षकच प्रभावीपणे करू शकतो. विद्यार्थ्याच्या मनातील संभ्रम ओळखणे, त्याच्या क्षमतेवर विश्वास ठेवणे, अपयशातून पुन्हा उभे राहण्याची प्रेरणा देणे आणि त्याला माणुसकीची जाणीव करून देणे या गोष्टी कोणतेही तंत्रज्ञान पूर्णपणे करू शकत नाही. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या वापरामुळे शिक्षणक्षेत्रासमोर नवे प्रश्न उभे राहिले आहेत. विद्यार्थ्यांना लेखन, माहिती संकलन, भाषांतर, गणना आणि विविध शैक्षणिक कामांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेची साधने सहज उपलब्ध होत आहेत. या बदलाकडे केवळ धोका म्हणून पाहण्याऐवजी त्याचा जबाबदारीने वापर कसा करायचा, हे विद्यार्थ्यांना शिकविण्याची गरज आहे. विद्यार्थ्याची स्वतः विचार करण्याची क्षमता, सर्जनशीलता आणि चिकित्सक दृष्टी कमी होणार नाही, याची काळजी शिक्षकाने घेतली पाहिजे. तयार उत्तर स्वीकारण्यापेक्षा प्रश्न समजून घेणे, उपलब्ध उत्तरांची चिकित्सा करणे आणि स्वतःचे स्वतंत्र मत विकसित करणे याला शिक्षणात महत्त्व दिले पाहिजे. त्यामुळे भविष्यातील शिक्षक हा तंत्रज्ञानविरोधी नसून तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर करणारा आणि विद्यार्थ्यांना त्याचे नैतिक भान देणारा असणे आवश्यक आहे.

शिक्षणाचे आणखी एक महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे मूल्यांची जडणघडण. ज्ञान आणि कौशल्ये आवश्यक असली तरी त्यांना नैतिक मूल्यांची जोड नसेल तर शिक्षण अपूर्ण राहते. समता, स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, सहिष्णुता, सामाजिक संवेदनशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवी प्रतिष्ठेचा आदर ही मूल्ये विद्यार्थ्यांच्या मनात रुजविणे आवश्यक आहे. समाजात विविध जाती, धर्म, भाषा, प्रदेश, आर्थिक स्तर आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेले लोक एकत्र राहतात. या विविधतेचा आदर करत सहजीवनाची भावना निर्माण करणे हे शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आहे. शिक्षक स्वतः आपल्या वर्तनातून समानता आणि सहिष्णुतेचा आदर्श निर्माण करत असेल, तर त्याचा विद्यार्थ्यांवर अधिक प्रभाव पडतो. कारण विद्यार्थ्यांना शिक्षकाचे बोलणे जितके महत्त्वाचे वाटते, तितकेच त्याचे आचरणही महत्त्वाचे वाटते.सामाजिक विषमता कमी करण्यासाठी शिक्षण हे प्रभावी साधन आहे. मात्र शिक्षणव्यवस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना समान संधी मिळतेच असे नाही. ग्रामीण, आदिवासी, भटक्या-विमुक्त, आर्थिकदृष्ट्या दुर्बल, दिव्यांग आणि विविध कारणांमुळे वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांसमोर अनेक अडचणी असतात. अशा विद्यार्थ्यांच्या गरजा समजून घेऊन त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षकाने संवेदनशील भूमिका बजावली पाहिजे. विद्यार्थ्याच्या आर्थिक परिस्थितीवरून त्याच्या क्षमतेचा अंदाज बांधणे किंवा त्याला कमी लेखणे हे शिक्षणाच्या मूलभूत तत्त्वांना विरोधी आहे. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये काही ना काही क्षमता असते. त्या क्षमतेला योग्य दिशा देणे आणि आत्मविश्वास निर्माण करणे हे शिक्षकाचे खरे कौशल्य आहे.

**डॉ.राजेंद्र बगाटे**

विशेषतः ग्रामीण भागातील शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अनेक ग्रामीण आणि दुर्गम भागांत आजही शैक्षणिक साधनसुविधा, डिजिटल सुविधा, वाहतूक आणि इतर पायाभूत सोयींच्या मर्यादा आहेत. काही विद्यार्थ्यांना कौटुंबिक आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण सोडावे लागते, तर काही विद्यार्थ्यांवर घरकाम, शेती किंवा इतर जबाबदाऱ्यांचा भार असतो. अशा परिस्थितीत शिक्षक केवळ अध्यापन करणारा राहत नाही; तो विद्यार्थ्याच्या कुटुंबाशी संवाद साधणारा, पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारा आणि विद्यार्थ्याला शिक्षणात टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करणारा सामाजिक घटक बनतो. ग्रामीण समाजाच्या परिवर्तनात शिक्षकाचे योगदान त्यामुळे विशेष अधोरेखित होते.

मुलींच्या शिक्षणाच्या संदर्भातही शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवणाऱ्या सामाजिक मानसिकतेविरुद्ध जनजागृती करण्याचे काम शिक्षक करू शकतो. मुलींच्या शिक्षणामुळे केवळ एका व्यक्तीचा विकास होत नाही, तर संपूर्ण कुटुंबाच्या आणि पुढील पिढ्यांच्या जीवनमानावर त्याचा परिणाम होतो. शिक्षित मुलगी स्वतःचे निर्णय अधिक सक्षमपणे घेऊ शकते, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्याची संधी मिळवू शकते आणि सामाजिक प्रश्नांबाबत अधिक जागरूक होऊ शकते. त्यामुळे शिक्षकाने वर्गातील प्रत्येक मुलगा आणि मुलगी यांच्याकडे समान क्षमतेच्या दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. लिंगभेदमुक्त शिक्षण ही समताधिष्ठित समाजनिर्मितीची पूर्वअट आहे. आजच्या विद्यार्थ्यांसमोर मानसिक ताणाचे प्रश्नही वाढत आहेत. परीक्षेतील स्पर्धा, गुणांची अपेक्षा, करिअरची चिंता, कौटुंबिक परिस्थिती, सामाजिक माध्यमांचा प्रभाव आणि भविष्यातील अनिश्चितता यामुळे विद्यार्थ्यांच्या भावनिक आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. अशा परिस्थितीत शिक्षकाने विद्यार्थ्याच्या गुणांपेक्षा त्याच्या व्यक्तिमत्त्वाकडे पाहणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे, त्याच्या अडचणी समजून घेणे आणि गरजेनुसार योग्य मार्गदर्शन करणे हे शिक्षकाच्या कार्याचा महत्त्वाचा भाग बनत आहे. प्रत्येक विद्यार्थी सारख्याच पद्धतीने शिकत नाही आणि प्रत्येकाचे यशही एकाच मापाने मोजता येत नाही. विद्यार्थ्याच्या क्षमतेचा शोध घेऊन त्याला योग्य संधी देणे ही शिक्षणाची खरी कसोटी आहे.

शिक्षकाच्या कार्याचा विचार करताना त्याच्या स्वतःच्या कार्यपरिस्थितीकडे दुर्लक्ष करता येणार नाही. शिक्षकाकडून गुणवत्तापूर्ण अध्यापनाची अपेक्षा करताना त्याला आवश्यक शैक्षणिक साधने, प्रशिक्षण, तंत्रज्ञान, वेळ आणि शैक्षणिक स्वायत्तता मिळणे आवश्यक आहे. सतत बदलणारा अभ्यासक्रम, विविध शैक्षणिक उपक्रम, प्रशासकीय कामकाज आणि तंत्रज्ञानातील बदल यामुळे शिक्षकावर अतिरिक्त जबाबदाऱ्या येतात. शिक्षकाचा वेळ मुख्यतः विद्यार्थ्यांच्या अध्यापनासाठी आणि शैक्षणिक विकासासाठी वापरला गेला पाहिजे. शिक्षकाला सन्मानाची आणि विश्वासाची वागणूक मिळाली तर त्याच्या सर्जनशीलतेला चालना मिळते. शिक्षकाचा दर्जा उंचावणे म्हणजे शिक्षणाचा दर्जा उंचावणे होय. शिक्षकाने स्वतःही आयुष्यभर विद्यार्थी राहण्याची तयारी ठेवली पाहिजे. जग सतत बदलत आहे. नवीन ज्ञान, नवीन तंत्रज्ञान, नवीन सामाजिक प्रश्न आणि नवीन अध्यापनपद्धती सातत्याने पुढे येत आहेत. त्यामुळे एकदा शिक्षण पूर्ण केले की शिक्षकाचे शिकणे संपते, अशी कल्पना कालबाह्य झाली आहे. शिक्षकाने वाचन, संशोधन, प्रशिक्षण, चर्चासत्रे आणि अनुभवांच्या देवाणघेवाणीतून स्वतःचे ज्ञान सतत समृद्ध केले पाहिजे. स्वतः शिकणारा शिक्षकच विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची जिज्ञासा निर्माण करू शकतो. शिक्षण ही स्थिर प्रक्रिया नसून सतत विकसित होणारी प्रक्रिया आहे, याची जाणीव शिक्षक आणि शिक्षणव्यवस्था या दोघांनाही असणे आवश्यक आहे.

पर्यावरणीय संकटांच्या काळात शिक्षकाची सामाजिक जबाबदारी आणखी वाढली आहे. हवामानबदल, पाण्याची कमतरता, प्रदूषण, जंगलतोड आणि जैवविविधतेचा ऱ्हास यांसारख्या प्रश्नांचा परिणाम भावी पिढ्यांवर होणार आहे. विद्यार्थ्यांना पर्यावरणाविषयी केवळ पुस्तकातील माहिती देणे पुरेसे नाही; पर्यावरणपूरक जीवनशैलीची सवय लावणे आवश्यक आहे. पाणी वाचविणे, ऊर्जा बचत करणे, वृक्षसंवर्धन करणे, कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करणे आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचा विवेकपूर्ण वापर करणे या सवयी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून समाजात रुजविता येतात. अशा प्रकारे शिक्षक वर्गखोलीच्या पलीकडे जाऊन सामाजिक आणि पर्यावरणीय परिवर्तनाचा वाहक बनतो. शिक्षक हा लोकशाही समाजाच्या निर्मितीतही महत्त्वाची भूमिका बजावतो. लोकशाही केवळ मतदानाची व्यवस्था नसून विचारस्वातंत्र्य, मतभिन्नतेचा आदर, संवाद, समानता आणि जबाबदारी यांवर आधारित जीवनपद्धती आहे. विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची, आपले मत मांडण्याची आणि दुसऱ्याचे मत ऐकण्याची संधी देणारी वर्गखोली ही लोकशाही संस्कारांची पहिली प्रयोगशाळा ठरू शकते. शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना प्रोत्साहन दिले आणि मतभिन्नतेचा आदर केला तर त्यातून चिकित्सक आणि जबाबदार नागरिक घडू शकतात. समाजात वाढणाऱ्या असहिष्णुतेला उत्तर देण्यासाठी विवेकशील आणि संवादक्षम पिढी निर्माण करणे ही आजची मोठी गरज आहे.

खऱ्या अर्थाने शिक्षकाचा प्रभाव त्याने किती धडे शिकविले यापेक्षा त्याने किती विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला यावर मोजला पाहिजे. एखाद्या विद्यार्थ्याला स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवायला शिकविणे, अपयशानंतर पुन्हा प्रयत्न करण्याची प्रेरणा देणे, चुकीतून शिकण्याची तयारी निर्माण करणे किंवा समाजातील इतरांविषयी संवेदनशीलता निर्माण करणे ही शिक्षकाच्या कार्याची मोठी फलश्रुती आहे. शिक्षकाचे एखादे वाक्य, एखादा सल्ला किंवा एखाद्या क्षणी दिलेला आधार विद्यार्थ्याच्या संपूर्ण आयुष्याला दिशा देऊ शकतो. म्हणून शिक्षक हा केवळ ज्ञान देणारा नसून भविष्य घडविणारा व्यक्ती असतो.

आज शिक्षणव्यवस्थेकडे केवळ रोजगारनिर्मितीच्या साधनाच्या दृष्टीने पाहण्यापेक्षा मानवी विकासाचे माध्यम म्हणून पाहण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांना रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये मिळाली पाहिजेत; परंतु त्याचबरोबर त्यांच्यात सामाजिक जबाबदारी, नैतिक जाणीव, सर्जनशीलता, सहकार्याची भावना आणि मानवी मूल्येही विकसित झाली पाहिजेत. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीबरोबर माणुसकीची प्रगतीही झाली पाहिजे. या दोन्हींचा समतोल साधण्याचे काम शिक्षक करू शकतो. म्हणूनच आधुनिक शिक्षणव्यवस्थेत शिक्षकाचे स्थान केवळ अध्यापनापुरते मर्यादित न ठेवता समाजनिर्मितीच्या व्यापक प्रक्रियेत मान्य केले पाहिजे. जागतिक शिक्षक दिन हा त्यामुळे शिक्षकांना शुभेच्छा देण्याचा केवळ औपचारिक दिवस नसून शिक्षण आणि शिक्षक यांच्या भविष्याचा विचार करण्याचा दिवस आहे. शिक्षकांचा सन्मान हा एका दिवसापुरता मर्यादित न राहता त्यांच्या कार्याला समाजात योग्य प्रतिष्ठा, शिक्षणाला आवश्यक साधने आणि विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी सक्षम वातावरण निर्माण करण्यात प्रतिबिंबित झाला पाहिजे. शिक्षकांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहणे, त्यांना सतत प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे, नव्या तंत्रज्ञानाशी परिचित करून देणे आणि अध्यापनासाठी आवश्यक स्वायत्तता देणे ही शिक्षणाच्या गुणवत्तेसाठी आवश्यक पावले आहेत.

५ ऑक्टोबरचा जागतिक शिक्षक दिन आपल्याला हेच स्मरण करून देतो की राष्ट्राची खरी उभारणी केवळ भव्य इमारती, आधुनिक तंत्रज्ञान किंवा आर्थिक प्रगतीतून होत नाही; ती विचारशील, संवेदनशील, कर्तव्यदक्ष आणि विवेकी नागरिकांच्या निर्मितीतून होते. अशा नागरिकांच्या निर्मितीची प्रक्रिया वर्गखोलीत सुरू होते आणि तिच्या केंद्रस्थानी शिक्षक असतो. काळ बदलला, अध्यापनाची साधने बदलली, ज्ञान मिळविण्याचे मार्ग बदलले आणि तंत्रज्ञान अधिक सामर्थ्यवान झाले, तरी विद्यार्थ्याला समजून घेणारा, त्याच्या क्षमतेवर विश्वास ठेवणारा आणि त्याला माणूस म्हणून घडविणारा शिक्षक कालातीत राहणार आहे. म्हणून शिक्षकाचा खरा सन्मान हा एका दिवसाच्या अभिनंदनात नसून प्रत्येक विद्यार्थ्याला समान संधी, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि उज्ज्वल भविष्य देण्याच्या सामूहिक प्रयत्नांत आहे. शिक्षक हा केवळ आजचा अध्यापक नसतो; तो उद्याच्या समाजाचा शिल्पकार असतो. म्हणूनच शिक्षकाचा सन्मान म्हणजे शिक्षणाचा सन्मान आणि शिक्षणाचा सन्मान म्हणजे समाजाच्या उज्ज्वल भविष्याचा सन्मान होय.

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# पैनगंगेचे पाणी आरक्षित करा,अन्यथा माहूरवर हिवाळ्यातच जलसंकट!



## पावसाने पाठ फिरवली,जलस्त्रोत आटले;उन्हाळ्यापूर्वीच पाणीटंचाईची भीती

माहूर/प्रतिनिधी-यंदा पावसाने पाठ फिरवल्याने माहूर तालुक्याच्या जलसुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून, शहराची जीवनवाहिनी असलेल्या पैनगंगा नदीपात्रातच पाण्याचा ठणठणाट सुरू झाला आहे. नदीपात्रातील उपलब्ध पाणी कोल्हापुरी बंधाऱ्यातून विसर्ग होत असताना माहूर शहरासाठी पाणीसाठा आरक्षित करण्याबाबत तातडीने निर्णय घेतला नाही, तर यंदा उन्हाळ्याची वाट पाहण्याची गरज पडणार नाही; हिवाळ्यातच माहूरकरांच्या नळांना कोरडे पडण्याची वेळ येण्याची भीती निर्माण झाली आहे.

माहूर शहराची लोकसंख्या सुमारे २५ हजारांच्या घरात असली तरी हे महाराष्ट्रातील प्रमुख तीर्थक्षेत्र असल्याने वर्षभर येथे भाविकांची मोठी वर्दळ असते. शहराची तरंगती लोकसंख्या अनेकदा ५० हजारांच्या पुढे जाते. त्यातच वर्षभर होणाऱ्या विविध धार्मिक यात्रा, उत्सव आणि नवरात्रासारख्या मोठ्या पर्वांमध्ये लाखो भाविक माहूरगडावर दाखल होतात. अशा परिस्थितीत शहराच्या पिण्याच्या पाण्याचे नियोजन केवळ स्थानिक लोकसंख्येपुरते मर्यादित ठेवून चालणार नाही. माहूरच्या जलसाठ्याचा प्रश्न हा आता प्रशासनाच्या गांभीर्याची कसोटी ठरणार आहे. सध्या माहूर नगर पंचायत च्या पाणी पुरवठा योजने मार्फत हर घर नल से जल पोहचविण्यात येत असून अनेक भागांत नळाला मुबलक पाणी मिळत असल्याने नागरिकांना पाणीटंचाईची तीव्रता जाणवत नसली, तरी हा दिलासा किती दिवस टिकणार, हा खरा प्रश्न आहे. नदीपात्रातच पाणी शिल्लक राहिले नाही, तर पाणीपुरवठा योजना चालणार कशी? पाण्याचा स्रोत आटत असताना केवळ नळयोजना सुरू असल्याचे दाखवून जलसंकट टाळता येणार नाही. उपलब्ध पाणी आत्ताच अडवून आणि आरक्षित करून ठेवले नाही, तर पुढील काही महिन्यांत परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता आहे. यंदाच्या पावसाळ्यात मोठा खंड पडल्याने जमिनीतील पाणीपातळी अपेक्षेप्रमाणे वाढलेली नाही. नदी-नाले ओसंडून वाहण्याऐवजी अनेक ठिकाणी कोरडेच राहिले. पावसाळा संपत असताना जलस्रोतांमध्ये अपेक्षित पाणीसाठा निर्माण झाला नसल्याने आगामी काळात पिण्याचे पाणी, शेती आणि जनावरांच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची चिन्हे आहेत. पावसाची तूट आज दिसत असली, तरी तिचे खरे परिणाम हिवाळा आणि उन्हाळ्यात जाणवणार आहेत. माहूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पैनगंगेच्या पात्रात सध्या उपलब्ध असलेले पाणी भविष्यासाठी अडवणे आणि शहरासाठी आवश्यक पाणीसाठा आरक्षित करणे ही तातडीची गरज बनली आहे. कोल्हापुरी बंधाऱ्यातील पाण्याचा विसर्ग सुरूच राहिला आणि उपलब्ध साठ्याचे नियोजन केले गेले नाही, तर प्रशासनाच्या डोळ्यांसमोरच मौल्यवान पाणी वाहून जाण्याची वेळ येऊ शकते. याशिवाय माहूर तालुक्यातील ग्रामीण भागाची परिस्थितीही दुर्लक्षित करून चालणार नाही. पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने अनेक गावांतील विहिरी, बोअरवेल आणि इतर स्थानिक जलस्रोतांवर आगामी काळात ताण वाढण्याची शक्यता आहे. पिण्याच्या पाण्यासोबतच जनावरांसाठी पाणी आणि शेतीसाठी उपलब्ध असलेल्या जलस्रोतांचेही नियोजन करावे लागणार आहे. संभाव्य टंचाईग्रस्त गावांची यादी तयार करून त्यानुसार टँकर, विहिरींचे अधिग्रहण, जलसाठ्यांचे आरक्षण आणि अन्य पर्यायी उपाययोजना याबाबत प्रशासनाने आतापासूनच कृती आराखडा तयार करण्याची गरज आहे. पाणीटंचाई निर्माण झाल्यानंतर धावपळ करण्यापेक्षा टंचाई येण्यापूर्वीच नियोजन करणे प्रशासनाची जबाबदारी आहे. पैनगंगा नदीत आज जे काही पाणी उपलब्ध आहे, ते उद्या असेलच याची शाश्वती नाही. त्यामुळे माहूर शहरासाठी आवश्यक पाणीसाठा तातडीने आरक्षित करून पाण्याचा विसर्ग नियंत्रित करण्याबाबत संबंधित विभागांनी ठोस निर्णय घेणे गरजेचे आहे. एकीकडे तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी कोट्यवधींच्या योजना, भाविकांच्या सोयीसाठी विविध प्रकल्प आणि मोठ्या प्रमाणावर यात्रांचे नियोजन केले जाते; मात्र या सर्व विकासाच्या केंद्रस्थानी असलेला पाणी हा मूलभूत प्रश्न दुर्लक्षित राहिला, तर विकासाच्या घोषणा कागदावरच राहण्याची शक्यता आहे. आता प्रशासनाने जागे होण्याची वेळ आली आहे. पैनगंगेचे उपलब्ध पाणी आरक्षित करा, जलस्रोतांचे तातडीने सर्वेक्षण करा आणि संभाव्य टंचाईग्रस्त गावांसाठी कृती आराखडा तयार करा. अन्यथा यंदा माहूरकरांना उन्हाळ्यात नव्हे, तर हिवाळ्यातच पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ येऊ शकते.

# ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात इंडिया आघाडीचा बुधवारी महामोर्चा

नांदेड/प्रतिनिधी-मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात काँग्रेससह इंडिया आघाडीच्या वतीने आंदोलन अधिक तीव्र करण्याच्या दृष्टीने नांदेडमध्ये बुधवार दि.७ ऑक्टोबर रोजी महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान खा. रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील इंडिया आघाडीतील सर्व राजकीय पक्षांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची विशेष नियोजन बैठक घेण्यात आली असून पुर्ण ताकदीने मोर्चा यशस्वी करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात काँग्रेससह इंडिया आघाडीने देशभर आक्रमक पवित्रा घेतला आहे. दरम्यान नांदेड मध्ये देखील इंडिया आघाडीतील सर्व राजकीय पक्षांच्या वतीने बुधवार दि. ७ ऑक्टोबर रोजी शहरातील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय या दरम्यान महामोर्चा आयोजित करण्यात आला आहे. दरम्यान काँग्रेस दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा खासदार रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील इंडिया आघाडीतील सर्व राजकीय पक्षांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. यावेळी माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर, काँग्रेसचे उत्तर जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बबन बारसे, सीपीआयचे कॉ. प्रदीप नागणूरकर, जिल्हाप्रमुख भुजंग पाटील, सुरेशदादा गायकवाड, काँग्रेस महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार, नगरसेवक मुन्ना अब्बास, शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुनील पाटील कदम, सीपीएमचे विनोद गोविंदवार, राष्ट्रवादीचे तातेराव पाटील आलेगावकर, माजी उपमहापौर आनंद चव्हाण, महानगरप्रमुख मनोज यादव, सीपीआयचे कॉ. गंगाधर गायकवाड, राजू पाटील यांच्यासह विविध पक्षांचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत महामोर्चाचे नियोजन, विविध राजकीय पक्षांचा सहभाग, कार्यकर्त्यांची उपस्थिती तसेच आंदोलनाची पुढील दिशा यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजिनाम्यासह लोकशाही मूल्यांचे रक्षण, निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि मतदारांच्या प्रश्नांना वाचा फोडणे हा या महामोर्चाचा प्रमुख उद्देश असल्याची माहिती खा. रवींद्र चव्हाण यांनी दिली आहे.

# एन.टी.सी.मिल सुरु करण्यासाठी प्रयत्न करणार-आ.आनंद बोंढारकर

नांदेड/प्रतिनिधी-एन.टी.सी.मिल सुरु करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आ. आनंदराव बोंढारकर यांनी एन.टी.सी.मिल पाहणीसाठी आलेल्या उस्मानशाही मिल संवर्धन समितीच्या शिष्टमंडळास अस्वासित केले.



एन.टी.सी.मिल मिल पुन्हा सुरु करता येईल का, यासाठी नांदेड उत्तर विधानसभा मतदार संघाचे आ.बोंढारकर रविवार ४ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता मिलची पाहणी करण्यासाठी आले होते. यावेळी बोलताना आ.बोंढारकर म्हणाले की,नांदेड जिल्ह्यास पाच खासदार आहेत, यांच्या माध्यमातून केंद्र सरकारकडून निधी उपलब्द करून घेण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केल्यास मिलचे पुनर्जीवन होऊ शकते, असा विस्वास बोंढारकर यांनी व्यक्त केला. उस्मानशाही मिल संवर्धन समितीचे मार्गदर्शक श्याम निलंगेकर, तरन्नूम महोम्मद, डॉ.किरण चिद्रावर, यशवंत थोरात, ललिता कुंभार, प्रा.प्रल्हाद इंगोले, ॲड.शिवराज कोळीकर, मोहम्मद अब्दुल आफिस यांनी आपल्या मनोगतात मिल सुरु कारण्याबाबत सूचना केल्या. सुरुवातीस आ.आनंदराव बोंढारकर व समितीचे मार्गदर्शक श्याम निलंगेकर यांचे स्वागत एन.टी.सी.मिलचे व्यवस्थापक गायकवाड यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. यावेळी झालेल्या बैठकीत दीपक पावळे, दीपक सातोरे, लखन कापसे, हर्षद भाई यांची उपस्थिती होती. बैठकीचे संचालन सुभाष लोखंडे यांनी केले. मिलचे कार्यरत असलेले कामगार व कर्मचारी उपस्थित होते.

# चाकूरच्या पोल्ट्री फार्ममुळे परिसरात दुर्गंधीचे साम्राज्य

## कारवाईसाठी शिवसेनेचा प्रशासनाला इशारा

देगलूर/प्रतिनिधी-एका पोल्ट्री फार्मचा व्यवसाय फुलतोय मात्र त्याच्या दुर्गंधीने आसपासच्या गावकऱ्यांचा श्वास कोंडतोय या प्रकारामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून या बाबीकडे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळांनी तात्काळ लक्ष देण्याची मागणी शिंदे गटाचे युवासेना जिल्हाप्रमुख नामदेव पाटील देगावकर यांनी केली आहे.

देगलूर तालुक्यातील चाकूर येथील माळरानावर मोठ्या प्रमाणात कुक्कुटपालन व्यवसाय सुरू आहे. मात्र या पोल्ट्री फार्ममधील कचरा, कोंबड्यांची विष्ठा व जैविक अवशेषांची योग्य विल्हेवाट लावली जात नसल्याने परिसरात तीव्र दुर्गंधी पसरत असल्याचा आरोप आहे. चाकूर, कावळगाव, कारेगाव, बोरगाव यांसह आजूबाजूच्या गावांतील नागरिकांना या दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. सदर पोल्ट्री फार्मची उभारणी लगतच्या राज्यातील एका बड्या व्यापाऱ्याने केल्याचे तक्रारीत नमूद करून व्यवस्थापनाबाबतही प्रश्न उपस्थित केले आहेत. या प्रकरणी तक्रार केल्यास दमदाटी केली जात असल्याचे आरोपही काही जागरूक नागरिकांनी केले आहेत. प्रशासनाने झोपेचे सोंग सोडावे यासाठी या गंभीर प्रकाराची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार सादर केली आहे. पोल्ट्री फार्मची प्रत्यक्ष पाहणी करून स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, दुर्गंधी नियंत्रण आणि प्रदूषणविषयक नियमांची तपासणी करावी. नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करून नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी करीत व्यावसायिकांच्या नफ्यासाठी गावकऱ्यांच्या आरोग्याचा बळी का? असा सवाल युवा जिल्हाप्रमुख नामदेव पाटील देगावकर यांनी उपस्थित करत प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# विभागीय बॉक्सिंगमध्ये प्रताप धवनचा सुवर्ण ठोसा!

लोहा/प्रतिनिधी-लातूर येथे नुकत्याच पार पडलेल्या विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत संत गाडगे महाराज विद्यालय, लोहा तसेच ब्लॉइज बॉक्सिंग कोचिंग क्लासचा विद्यार्थी प्रताप गोविंदराव धवन याने उत्कृष्ट कामगिरी करत विभागातून प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे त्याची आगामी राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



प्रताप धवन याने स्पर्धेत आत्मविश्वासपूर्ण खेळाचे प्रदर्शन करत प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. त्याच्या या यशामुळे संत गाडगे महाराज विद्यालय, लोहा तसेच ब्लॉइज बॉक्सिंग कोचिंग क्लासच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.प्रतापच्या या यशाबद्दल संत गाडगे महाराज विद्यालय संस्थेचे अध्यक्ष, क्रीडा शिक्षक प्रा. अमूल शेंडगे सर, चव्हाण सर, बॉक्सिंग प्रशिक्षक दीपा मॅडम, काका संतोष पगारे, हॉस्टेलचे शिक्षक आत्माराम सवराते तसेच मित्रपरिवाराने त्याचे मनःपूर्वक अभिनंदन केले. राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# मटका अड्डयावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील कल्याणनगर रोडवर सुरु असलेल्या मटका अड्डयावर शनिवारी सायंकाळी भाग्यनगर पोलीसांनी धाड टाकली आहे. याप्रकरणी मटका किंग कमल यादव याच्यासह पाच जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कल्याणनगर रोडवर मटका अड्डा सुरु असल्याची माहिती भाग्यनगर पोलीसांना मिळाली. पोलीसाच्या एका पथकाने शनिवारी सायंकाळी मटका अड्डयावर धाड टाकली. लोकांकडून पैसे घेवून मिलन डे नावाचा मटका घेतांना अनिल थोरात रा. बालाजीनगर,नांदेड, धम्मदीप थोरात रा.वारंगा फाटा, गणेश माधवराव मरदडे रा.शिवरायनगर, वेणु कांबळे, कमल यादव रा.नांदेड यांना रंगेहाथ पकडले. त्यांच्या जवळून मटका घेण्याचे साहित्य, रोख ८ हजार ७०० रुपये जप्त करण्यात आले आहेत.


## जाहीर प्रगटन

मा.श्री.ए.जी.चव्हाण, ६ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, नांदेड
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१४३६/२०२६
नसीम बानु व इतर विरुद्ध निरंक

अर्जदार : १. नसीम बानु भ्र.मोहम्मद अब्दुल रशीद वय : ४७ वर्षे, धंदा : घरकाम, २. असमा महजबीन पि.अब्दुल रशीद वय : २७ वर्षे, धंदा घरकाम, ३. मोहम्मद अब्दुल कदीर पि.मोहम्मद अब्दुल रशीद वय : २२ वर्षे, धंदा : घरकाम, ४. जाहेदा बेगम भ्र.अब्दुल खदीर वय : ८० वर्षे, धंदा : व्यवसाय, सर्व रा.घर क्र.९-६-२३९, उमर कॉलनी, देगलूर नाका,नांदेड

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

दावा : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ ते ४ यांनी कायदेशीर वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जदार हे मयत मोहम्मद अब्दुल रशीद मोहम्मद अब्दुल खदीर यांचे कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्र.१ ही त्यांची पत्नी, अर्जदार क्र.२ व ३ ही त्यांची अपत्ये व अर्जदार क्र.४ ही त्यांची आई आहे. त्यांचा मृत्यू दिनांक १६/०९/२०२४ रोजी नांदेड येथे झाला, त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र नांदेड महानगरपालिकेने निर्गमित केले असून त्यांच्या मृत्यू प्रमाणपत्राच्या प्रती प्रस्तुत संचिकेत दाखल करण्यात आलेल्या आहेत. अर्जदाराच्या अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारस नाही, असे अर्जदारांनी अर्जात नमुद केले आहे. अर्जदारास शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयीन कामासाठी वारसाहक्क प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदार यांना मयत मोहम्मद अब्दुल रशीद मोहम्मद अब्दुल खदीर यांचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकीलामार्फत या न्यायालयात दिनांक ४/११/२०२६ पर्यंत किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत हजर राहून आक्षेप नोंदवावा/सादर करावा. या तारखेनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. तसेच अर्ज एकतर्फी निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

करिता हे जाहीर प्रगटन आज दिनांक २८/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
६ वे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहायक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

पुढील तारीख १७/११/२०२६

## जाहीर प्रगटन

हिमायतनगर येथील दिवाणी न्यायाधिश क.स्तर,यांचे न्यायालयात
हिमायतनगर जि.नांदेड
किरकोळ अर्ज क्र.आर.जे.ई.१२४/२०२६

अर्जदार : १) सुहेल सय्यद काझी पि.सय्यद सैफोद्दीन, वय-७१ वर्षे, धंदा-व्यापार, रा.प्रकाश हॉस्पीटल जवळ,सदर,नागपूर-४४०००१, २) साहिबा मिर्झा भ्र.वसीम मिर्झा (साहिबा पि.काझी सयद सैफोद्दीन), वय-६९ वर्षे, धंदा-घरकाम, रा.दिलशादनगर, गडी मलकापुर, आसीफनगर, हिमायुननगर, हैद्राबाद-५०००२८

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

मुंबई विनीमय कायदा १८२७ नुसार मयत नामे सिद्दीकाबेगम भ्र.काझी सयद सैफोद्दीन यांच्या मृत्युपश्चात अर्जदारास कायदेशिर वारसा उत्तराधिकारी प्रमाणपत्र जारी करणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, सिद्दीकाबेगम भ्र.काझी सयद सैफोद्दीन यांचा मृत्यु दिनांक २४/०९/२०१२ रोजी दम्मम, किंगडम ऑफ सौदी अरेबीया येथे मयत झाले आहेत. सिद्दीकाबेगम भ्र.काझी सयद सैफोद्दीन हे रा.हिमायतनगर ता.हिमायतनगर जि.नांदेड येथील रहिवाशी होते. मयतांच्या पश्चात अर्जदार हे सध्या वरील ठिकाणचे रहिवासी आहे. त्यांनी कायदेशीर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदार ह्यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदार ह्यांचे नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरुपात स्वतः हजर राहुन अथवा त्यांचे विधीज्ञ मार्फत ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही काही आक्षेप/उजर नाही असे समजून प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दिनांक ०३/१०/२०२६ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्याने देण्यात आले.

स्वाक्षरित/-
**क.लिपीक**
दिवाणी न्यायालय
क.स्तर,हिमायतनगर

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहा.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय,क.स्तर,
हिमायतनगर

CHANGE IN NAME

My (old name) is **KHORIYA SUDHIR** which now I am, changing as (new name) **SUDHIRKUMAR GOVINDRAM KHORIYA**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**SUDHIRKUMAR GOVINDRAM KHORIYA**
R/o VIP road Global hospital samor,
Visawa nagar Nanded-431602
Mob. No.9673335222

CHANGE IN NAME

My (old name) is **GUTTE DNYANESHWAR** which now I am, changing as (new name) **DNYANESHWAR MADHAVRAO GUTTE**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**DNYANESHWAR MADHAVRAO GUTTE**
R/o at.Sawargaon wadi, post Sawargaon
Tq.Mukhed Dist. Nanded-431715
Mob. No.7774020055

CHANGE IN NAME

My (old name) is **PAWAR SAINATH** which now I am, changing as (new name) **HARIOM PARMESHWAR PAWAR**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**HARIOM PARMESHWAR PAWAR**
R/o banglow no.92 Bhagat singh road,
Padmaja city new Kautha Nanded-431603
M.No.-8888843028

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व संबंधीतांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळवण्यात येते की, मी गीता ढेगळे व शुभांगी पडोळे आणि उर्मीला ढेगळे आम्ही रहिवाशी अकबर मुस्लीम यांचे मालकीचे व ताब्याचे स्वामी रामानंद तीर्थ चतुर्थ श्रेणी सहकारी गृहनिर्माण संस्था म.म्हाळजा ता.जि.नांदेड मर्यादित सर्वे नं.३ मधील प्लॉट नं.११२, ११३, ११५ हे प्लॉट कायमचे विकत घेण्याचा करार केला आहे. बयाना पोटी काही रक्कम दिली आहे.

वरील प्लॉट बाबत कोणास काही आक्षेप असेल तर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत आमच्याकडे लेखी कागदपत्रासह आपले आरोप दाखल करावेत. मुदत संपल्यावर कोणाचीही तक्रार नाही असे ग्राह्य धरुन या प्लॉटचा ताबा करुन देण्यात येईल. मुद्दत संपल्यानंतर कोणताही आक्षेप स्वीकारला जाणार नाही.

स्वाक्षरित/-
**अकबर मुस्लिम**
मो.नं.९२९२१६०७७०

स्वाक्षरित/-
**शुभांगी पडोळे**
मो.नं.७५१७०७४६६९

पान १ वरुन

### निवडणूक आयोगाने...

न्यायालय या प्रकरणाकडे लक्ष देत असल्याचे स्पष्ट केले. मात्र, मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधात तातडीचा अंतरिम आदेश देण्यास खंडपीठाने नकार दिला. निवडणूक आयोगाने घेतलेले कथित एकतर्फी निर्णय रद्द करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. दरम्यान, निवडणूक आयोग ही बहुसदस्यीय घटनात्मक संस्था असल्याचे स्पष्ट करत, त्याच्याविरोधात थेट एफआयआर दाखल करता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले. आयोगाने कायद्यानुसारच आपले कामकाज करावे, अशी अपेक्षाही न्यायालयाने व्यक्त केली.

# ना.गडकरींच्या दालनात माहूरच्या रखडलेल्या महामार्गाचा प्रश्न

## पत्रकारांच्या शिष्टमंडळाची भेट;सर्व प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे आश्वासन



माहूर/प्रतिनिधी-श्रीक्षेत्र माहूर शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१-अ वरील बहुतांश विकासकामे गेल्या अनेक वर्षांपासून रखडल्याने अखेर हा प्रश्न थेट केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या दालनात पोहोचला आहे. माहूरच्या विकासकामांसाठी सातत्याने आवाज उठविणाऱ्या स्थानिक पत्रकारांच्या शिष्टमंडळाने रविवारी (४ ऑक्टोबर) नागपूर येथे केंद्रीय मंत्री गडकरी यांची भेट घेऊन महामार्गावरील प्रलंबित कामांचे निवेदन सादर केले. यावेळी महामार्गावरील सर्व रखडलेली कामे तातडीने पूर्ण करण्याचे आश्वासन गडकरी यांनी दिल्याची माहिती शिष्टमंडळाने दिली.

श्री दत्तात्रेय स्वामी, श्री रेणुकामाता आणि अनुसया माता यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या श्रीक्षेत्र माहूरगड येथे दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येतात. मात्र, शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील मूलभूत सुविधांची कामेच अपूर्ण असल्याने स्थानिक नागरिकांसह देशभरातून येणाऱ्या भाविकांना गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.शिष्टमंडळाने सादर केलेल्या निवेदनात महामार्गावरील बंद अवस्थेतील पथदिवे, अपूर्ण नाली बांधकाम, प्रलंबित पेव्हर ब्लॉक, अंतर्गत रस्त्यांची अपूर्ण जोडणी तसेच मालवाडा घाटातील रखडलेली कामे यांसह विविध समस्यांकडे केंद्रीय मंत्र्यांचे लक्ष वेधले. अनेक वर्षांपासून या प्रश्नांवर मागणी करूनही अपेक्षित कार्यवाही होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. तीर्थक्षेत्राच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या माहूर शहरातील महामार्गाची कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.श्री दत्तशिखर संस्थानचे प.पू. प.म. डॉ. धनेश्वर भारतीजी महाराज यांनीही महामार्गावरील सर्व अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबतचा संदेश केंद्रीय मंत्री गडकरी यांच्यापर्यंत पोहोचविला होता. महाराजांचा संदेश त्यांनी आदेश मानून आदरपूर्वक स्वीकारल्याचे शिष्टमंडळाने सांगितले.केंद्रीय मंत्र्यांनी या प्रश्नाची दखल घेत सर्व प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे आश्वासन दिल्याने माहूरच्या रखडलेल्या महामार्ग विकासकामांना आता गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.यावेळी वसंत कपाटे, विजय आमले, अपील बेलखोडे, सुरेश गिन्हे, राज ठाकूर, भाजपचे माजी शहराध्यक्ष पुरुषोत्तम लांडगे आणि नवनीत देवपूलवार उपस्थित होते.



एसआरमधील विविध अडचणी व त्रुटी दुर करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी निवासी उपजिल्हाधिकारी यांची भेट घेवून निवेदनाद्वारे केली. यावेळी जिल्हाध्यक्ष भगवानराव आलेगावकर, डॉ.मुजाहिद खान, कल्पना पाटील डोंगळीकर, तातेराव पाटील, लक्ष्मण भवरे, बाळासाहेब मादसवाड व इतर उपस्थित होते.

# ब्राह्मणगावात भीषण पाणी टंचाई;विहिरीत पाणी असूनही नागरिकांना पाणी विकत घेण्याची वेळ

उमरखेड/प्रतिनिधी-एकीकडे यंदा अत्यल्प पाऊस झाल्याने थेट उन्हाळ्यासारखी परिस्थिती निर्माण झाली असताना, दुसरीकडे ब्राह्मणगावात प्रशासनाच्या नियोजनशून्य कारभारामुळे कृत्रिम पाणी टंचाईने डोके वर काढले आहे. गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीत मुबलक पाणी असूनही, गेल्या ८ दिवसांपासून गावकऱ्यांना पैशाने पाणी विकत घेऊन तहान भागवावी लागत आहे.



उमरखेड तालुक्यातील ब्राह्मणगावला गेल्या ५० वर्षांपासून सोईट (म) शिवारातील विहिरीवरून ग्रामपंचायतीमार्फत पाणी पुरवठा केला जातो. अतिरिक्त दाबामुळे वारंवार बिघाड होऊन ब्राह्मणगावचा वीज पुरवठा खंडित होत होता. त्यामुळे काही दिवसांपूर्वी या विहिरीवरील विद्युत कनेक्शन थेट ढाणकी सबस्टेशनला जोडण्यात आले. मात्र, या नव्या जोडणीमुळेच मोठा घोळ झाला आहे. ढाणकी सबस्टेशन अंतर्गत येणाऱ्या आठ-आठ तासांच्या भारनियमनाचा थेट फटका या विहिरीला बसत असून, मोटार चालवण्यासाठी पुरेसा वीज पुरवठाच मिळत नाही. परिणामी ऑक्टोबर महिन्यातच गावात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. तीव्र उन्हात पिण्याच्या पाण्यासाठी गावकऱ्यांची वणवण सुरू आहे. दैनंदिन गरज भागवण्यासाठी खाजगी टँकरने पाणी विकत घेण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. या गंभीर प्रश्नावर प्रशासनाकडून कासवगतीने हालचाली सुरू असून, तातडीचा उपाय न केल्याने नागरिक संतप्त झाले आहेत.

### पाणी आहे,नियोजन नाही!

धक्कादायक बाब म्हणजे ब्राह्मणगावला पाणीपुरवठा करणाऱ्या सोईट शिवारातील विहिरीत अजूनही दोन महिने पुरेल इतका पाणीसाठा असल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. पूर्वी या विहिरीजवळून वाहणाऱ्या एसकेएफ गायपांदण नाल्यात इसापूर धरणाचे पाणी मायनरद्वारे सोडले जात असल्याने विहिरीची पातळी टिकून राहत होती. परंतु मागील वर्षी नाल्याचे खोलीकरण झाल्याने आता सोडलेले पाणी विहिरीजवळ थांबतच नाही, थेट वाहून जाते. त्यामुळे आता इसापूरच्या डाव्या कालव्यातून कितीही पाणी सोडले तरी त्याचा ब्राह्मणगावला काडीमात्र उपयोग होणार नाही. ग्रामपंचायतीने तातडीने पर्यायी नियोजन करून भविष्यातील भीषण टंचाई टाळावी, अशी मागणी गावकऱ्यांमधून होत आहे.

# सरस्वती महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ यांची जयंती साजरी

किनवट/प्रतिनिधी-जेष्ठ स्वातंत्र्य सेनानी, थोर शिक्षण तज्ञ स्वामी रामानंद तीर्थ यांची जयंती कार्यक्रम व अभिजात मराठी भाषा गौरव दिन ३ ऑक्टोबर रोजी सरस्वती शिक्षण संस्थेच्या सरस्वती विद्यामंदिर कला महाविद्यालयात मोठ्या उत्साहात पार पडला.

मुख्याध्यापक कृष्णकुमार नेमानीवार व उपाध्यक्ष आदिवरद नेमानीवार यांच्या हस्ते स्वामीजींच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य मार्तंड कुलकर्णी आज अभिजात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख तथा भाषा शास्त्राचे अभ्यासक, समिक्षक माजी प्राचार्य डॉ.आनंद भंडारे व उच्च माध्यमिक विभागातील मराठी विषयाचे प्रा.सुमित चिंतकूटलावार यांचा सन्मान व गौरव करण्यात आला. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.किरण आयनेनीवार यांनी केले तर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.मनोहर थोरात आभार यांनी मानले.

# रामदास पाटील सुमठाणकरांचा दुष्काळ भागात पाहणी दौरा

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर-बिलोली विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे नेते रामदास पाटील सुमठाणकर यांच्या नेतृत्वाखाली दुष्काळ पाहणी व संवाद दौऱ्याला हाणेगाव सर्कलमधून सुरुवात झाली.

यावेळी जलसंधारण, पावसाचे पाणी साठवणूक, पाणी बचत करणाऱ्या सिंचन पद्धती, सौरऊर्जेवर चालणारे पंप तसेच आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. हाणेगाव येथे जिल्हा परिषद सदस्य दिलीप गोविंदराव बनखडके यांच्या निवासस्थानी अजू शेठ चमकुडे, मुक्तार सत्तार पटेल, यादवराव म्हणाजी सूर्यवंशी, शिवाजी पाटील लोणीकर, श्रीराम बनखडके यांच्याशी संवाद झाला. येडूर येथे पूर्व सरपंच नामदेवराव श्रीपतराव पाटील, मुस्तफा चांद मणियार, पंढरी पाटील, प्रभू शिवाजी पाटील उपस्थित होते. कुमारपल्ली येथे पूर्व सरपंच प्रल्हाद पाटील, सरपंच संजय म्हेत्रे, अमृतराव पाटील, पोलीस पाटील रेड्डी, गफार भाई, तर बिज्जलवाडी येथे सुनील पाटील, नागा रेड्डी कोरनाळे, गफार भाई यांच्याशी चर्चा करण्यात आली.यावेळी काँग्रेस तालुका अध्यक्ष विष्णू पाटील शेकापूरकर, महिला काँग्रेसच्या डॉ. पूजा गायकवाड, माधव पाटील, सुभाष कदम लिंगणकेरूकर, धनुसिंग दादा, सरपंच तानाजी पाटील, पूर्व सरपंच जयसिंग पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# गावठी पिस्टल बाळगणाऱ्या एका इसमास अटक

नांदेड/प्रतिनिधी-मुदखेड ते उमरी रोडवर स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी कारवाई करुन गावठी पिस्टल जवळ बाळगणाऱ्या एका इसमास अटक केली आहे.

मुदखेड ते उमरी रोडवरील संकल्प बार समोर एक इसम गावठी पिस्टल घेवून फिरत असल्याची माहिती स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरिक्षक रवी वाहुळे, फौजदार बळीराम दासरे, फौजदार माधव केंद्रे व पोलीस कर्मचाऱ्यांनी शनिवारी सायंकाळी सापळा रचून गावठी पिस्टल जवळ बाळगणाऱ्या माधव बालाजी देशमुख (वय २७), धंदा चालक रा.कृष्णानगर, मुदखेड यास अटक केली. त्याच्या जवळून एक गावठी पिस्टल व जीवंत काडतुस जप्त केले. याप्रकरणी माधव देशमुख याच्या विरुध्द मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

# शिक्षणातून माणूस घडतो की केवळ पदवीधर?

## पीपल्स कॉलेजच्या वादविवादात रंगली वैचारिक चुरस

नांदेड/प्रतिनिधी-पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांच्या जयंतीनिमित्त नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या पीपल्स कॉलेजतर्फे आयोजित आंतर महाविद्यालयीन राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धा उत्साहात पार पडली. आजचे शिक्षण माणूस घडविण्यास सक्षम आहे/नाही या विषयावर विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी शिक्षण, मूल्ये, तंत्रज्ञान, रोजगाराभिमुखता, सामाजिक बांधिलकी आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या विविध पैलूंवर अभ्यासपूर्ण मते मांडली.




स्पर्धेचे उद्घाटन संस्थेच्या सचिव श्यामल पत्की यांच्या हस्ते झाले. आजच्या शिक्षणातून केवळ ज्ञानसंपन्न नव्हे, तर संवेदनशील, मूल्यनिष्ठ आणि सामाजिक भान असलेला नागरिक घडणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. विकास सुकाळे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा वैचारिक स्पर्धेचे महत्त्व अधोरेखित केले. स्पर्धेचे उद्दिष्ट समन्वयक डॉ. डी. एन. मोरे यांनी स्पष्ट केले, तर आभार डॉ. विशाल पतंगे यांनी मानले. बक्षीस वितरण समारंभास संस्थेचे माजी अध्यक्ष तथा माजी खा. डॉ. व्यंकटेश काबदे, विद्यमान अध्यक्ष डॉ. प्रवीण पाटील, पदाधिकारी अँड. प्रफुल्ल अग्रवाल, कॉ. प्रदीप नागापूरकर, प्राचार्य डॉ. विकास सुकाळे, उपप्राचार्य डॉ. विशाल पतंगे, समन्वयक डॉ. डी. एन. मोरे आणि प्रा. कल्पना जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धेचे प्रायोजकत्व प्रा. कल्पना जाधव यांनी स्वीकारले.अंतिम निकालात यशवंत महाविद्यालय, नांदेडने प्रथम, नेताजी सुभाषचंद्र बोस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नांदेडने द्वितीय, तर सहयोग सेवाभावी संस्थेच्या कॉलेज ऑफ एज्युकेशनने तृतीय क्रमांक मिळविला. आदर्श महाविद्यालय, हिंगोलीला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. परीक्षक म्हणून डॉ. सूर्यप्रकाश जाधव, डॉ. धोंडिबा भुरे आणि डॉ. संदीप काळे यांनी काम पाहिले. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. विठ्ठल दहिफळे, डॉ. भगवान जाधव, डॉ. कल्पना जाधव, डॉ. मुकुंद कवडे, डॉ. संदीप गायकवाड, डॉ. विजय जाधव, डॉ. सुप्रिया गायकवाड यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# गोरठा शिवारातील जुगार अड्ड्यावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-गोरठा शिवारात एका शेतामध्ये सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर शनिवारी रात्री स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी धाड टाकुन २४ जणांना अटक केली आहे.

गोरठा शिवारातील एका शेतामध्ये अनेक दिवसांपासून जुगाराचा अड्डा सुरु होता. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या आदेशावरुन स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या एका पथकाने शनिवारी रात्री सदरील जुगार अड्ड्यावर धाड टाकली. जुगार खेळत असतांना केशव आनंदा सूर्यवंशी (वय २२) रा. गोरठा व इतर २३ जणांना अटक केली. त्यांच्याकडून रोख रक्कम व मोबाईल असा पावणे दोन लाख रुपयांचा ऐवज पोलीसांनी जप्त केला आहे. या प्रकरणी उमरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# रंगकर्मी डॉ.विलासराज भद्रे यांचे निधन

नांदेड/प्रतिनिधी-सुप्रसिद्ध नाट्य लेखक, रंगकर्मी आंबेडकरी चळवळीतील विचारवंत डॉ. विलासराज भद्रे (वय ५६) यांचे आज सोमवार (दि.५) पहाटे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.



डॉ.विलासराज भद्रे यांनी वैद्यकीय क्षेत्रासोबतच अभिनय, दिग्दर्शन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. आंबेडकरी विचारांच्या लेखनातून त्यांनी सामाजिक, सांस्कृतिक आणि वैचारिक क्षेत्रात योगदान दिले. त्यांच्या पश्चात आई, एक भाऊ माजी नगरसेवक अरुण भद्रे, पत्नी डॉ. वंदना भद्रे, एक मुलगी, दोन बहिणी असा परिवार आहे.

पान १ वरुन

### एमपीएससी अध्यक्ष-सदस्यांच्या...

संबंधित विद्यार्थ्यांसह अन्य आरोपींनाही अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी विद्यार्थ्यांनी अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.या पार्श्वभूमीवर पुण्यात आ. रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. पुण्यात विविध ठिकाणी विद्यार्थ्यांकडून आंदोलन करण्यात येत असून, एमपीएससीच्या कारभारात पारदर्शकता आणण्यासह परीक्षा प्रक्रियेत सुधारणा करण्याच्या मागण्या विद्यार्थ्यांकडून करण्यात येत आहेत. राज्यसेवा मुख्य परीक्षेतील बहुपर्यायी प्रश्नपद्धती आणि वर्णनात्मक प्रश्नपद्धतीचा मुद्दाही आंदोलनात चर्चेत आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी तसेच क्लासचालकांच्या शिष्टमंडळाची बैठक झाली होती. या बैठकीत आयोगाच्या अध्यक्षांना थेट पदावरून हटविण्यापूर्वी नियमानुसार चौकशीची प्रक्रिया आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. त्यानुसार आता आयोगाचे माजी व विद्यमान अध्यक्ष आणि सदस्यांविरोधात चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करण्याची शिफारस राज्यपालांकडे करण्यात आली आहे. यापूर्वीच विद्यार्थ्यांच्या मागण्यांपैकी एक महत्त्वाची मागणी असलेल्या एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांना सचिवपदावरून कार्यमुक्त करण्यात आले आहे.

### ९९ टक्के हिस्सेदारी,तरी...

सविस्तर अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले आहे. प्रकरणातील सर्व संशयितांची भूमिका, आर्थिक व्यवहार, संबंधित कागदपत्रे, निर्णयप्रक्रिया आणि परस्पर संबंध यांची सर्वंकष तपासणी करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.दरम्यान, पार्थ पवार यांचा या व्यवहारातील थेट सहभाग सिद्ध करणारा कोणताही पुरावा मिळाला नसल्याचे तपास अधिकाऱ्यांनी न्यायालयात स्पष्ट केले आहे. त्यामुळे डीजीपींच्या नव्या निर्देशांनंतर तपासात कोणते नवे पुरावे समोर येतात आणि त्याआधारे पुढील कारवाई कोणत्या दिशेने होते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटिंग अँण्ड लिथो प्रिंटिंग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४